विवेकानंद कॉलेज ,कोल्हापूर

(अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था)

# चौथे राष्ट्रीय अंतर महाविद्यालयीन युवासाहित्य संम्मेलना निमित्त

# ग्रंथदिंडी

प्रमुख उपस्थिती: मा.डॉ.बी.एम.हिर्डेकर

## दि.१८-०२-२०२५

स्थळ :शिक्षण महर्षी डॉ.बापुजी साळुंखे स्मारक ते ग्रंथालय

College Recog.No. H.S.C./ 1074/R-1/DT : 8-8-1976
College Code No. 23-09-002
College Udise No. 27341301006
ISHE Code : C-11059

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd.: June 19



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

( अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था )
२१३०,ई,वॉर्ड,ताराबाई पार्क, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६००३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित
नॅक मानांकन : "A+" ( सी.जी.पी.ए.-३.२१ )
कॉलेज उईथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स, यु.जी.सी., न्यु दिल्ली
स्टार कॉलेज - डी.बी.टी. - भारत सरकार
आय. एस ओ . ९००१:२०१५

Ph. : 0231-2658612 Fax : 0231-2658840 Resi.: 0231-2653962 Website :www.vivekanandcollege.ac.in E-mail :info@vivekanandcollege

संस्थापक
डॉ. बापूजी साळुंखे
D.Lit.

अध्यक्ष
मा. ना. चंद्रकांत दादा पाटील
उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

कार्याध्यक्ष
प्राचार्य अभयकुमार साळुंखे
M.A.

सचिव
प्राचार्या सौ. शुभांगी गावडे
M.Sc.,B.Ed.

प्राचार्य
डॉ. आर.आर. कुंभार
M.Sc.,M.Phil.,Ph

जावक क्रमांक व्हि.सी.के. 1264/2024-25 दिनांक : 20/2/2025

प्रति,
मा. व्यवस्थापक
हनुमान सेवा मंडळ,
श्री. विठ्ठल मंदिर,
बुरुड गल्ली, कोल्हापूर.

विषय : आभाराबाबत..

महोदय,

आमच्या महाविद्यालयात बुधवार दि. १८-०२-२५ रोजी चौथे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य सम्मेलन आयोजित केले होते, त्यानिमित्ताने ग्रंथदिंडीचे आयोजन केले होते. सदर साहित्य सम्मेलनासाठी आपल्या मंदिराकडून ग्रंथदिंडीसाठी पालखी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही महाविद्यालयातर्फे आपले आभारी आहोत. तसेच यापुढे असेच सहकार्य मिळावे ही विनंती.

कळावे,

पालखी मिळाली
Bangalkar

आपला विश्वासू

( डॉ. आर. आर. कुंभार)
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर.
(अधिकार प्रदत्त स्वायत्त)

14/2/25

प्रति,
मा. व्यवस्थापक
हनुमान सेवा मंडळ,
श्री. विठ्ठल मंदिर,
बुरुड गल्ली, कोल्हापूर.

विषय : ग्रंथदिंडीसाठी पालखी उपलब्ध करून देणेबाबत.

महोदय,

आमच्या महाविद्यालयात मंगळवार दि. १८-०२-२५ रोजी चौथे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य सम्मेलन आयोजित केले आहे. त्यासाठी ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे. सदर साहित्य सम्मेलनासाठी आपल्या मंदिराकडून ग्रंथदिंडीसाठी पालखी उपलब्ध व्हावी. ही विनंती .

कळावे,

आपला विश्वासू

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)






Periodical Section

तरुण भारत संवाद
शुक्रवार, २१ फेब्रुवारी २०२५

# नवोदितांसाठी युवा साहित्य संमेलनाची गरज

## डॉ. बी. एम. हिर्डेकर : विवेकानंद कॉलेजमधील युवा साहित्य संमेलन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त् वाचन व लेखन करणे गरजेचे आहे. युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांना मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची गरज आहे, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ व आय.क्यु.ए.सी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील युवा साहित्य संमेलनात मार्गदर्शन करताना डॉ. बी. एम. हिर्डेकर

अध्यक्षस्थानावरून प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, मराठी साहित्याला संत साहित्याची मोठी परंपरा लाभली आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून आपल्या ज्ञानात भर घातली पाहिजे. युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. प्रा. भीमराव धुळूबुळू यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. या संमेलनामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी अनेक विषयावरील आपल्या कविता सादर केल्या.

डॉ. ए. एस. महात, डॉ. संजय अंकुशराव, प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. एकनाथ आळवेकर यांनी कविता सादर केल्या. कौस्तुभ शिंदे, देवयानी जोशी, ऋषिकेश देशमाने यानी सदाबहार गीतगायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. प्रास्ताविक साहित्य संमेलनाचे समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी निधी कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील व प्रा.अविनाश गायकवाड यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. एस. अंकुशराव, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. कैलास पाटील, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.

21/02/2025

21.2.2025

# विवेकानंद महाविद्यालयात मंगळवारी आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्‌मय मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. १८) विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय सभागृहामध्ये सकाळी ९.३० वाजता चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या हस्ते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रथम सत्रात युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांची प्रकट मुलाखत होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. भीमराव धुळूबुळू यांच्या अध्यक्षतेखाली युवा कविसंमेलन होणार आहे. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी निधी कुलकर्णी असणार आहे. विद्यार्थी, प्राध्यापक व साहित्यिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संमेलनाचे समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले.



# अ. भा. आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कश्मीर गुलमर्ग येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या गायत्री लोळगे, वैष्णवी पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करत आईस स्टॉक खेळामध्ये टीम टार्गेट व टीम डिस्टन्स खेळ प्रकारात सुवर्णपदक मिळविले. स्पर्धांसाठी भारतामधून विविध विद्यापीठातून ४५ विद्यापीठांचा समावेश होता.

यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

15/2/25

15/2/25